**नियमित फौजदारी केस नं. ७०/२०२५**
**नि. क्र. २०**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – प्रतिक आत्माराम गोंधळी,

**वय**– २१ वर्षे, **व्यवसाय** – खाजगी नोकरी,

**राहणार** – मुरादपुर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून–**

**०१**. दिनांक २३/०४/२०२५ रोजी मी माझे वडील – आत्माराम गोंधळी यांना सी.पी.आर.हॉस्पीटल, कोल्हापुर येथे घेवुन आलो होतो. माझ्या वडीलांचा दिनांक २२/०४/२०२५ रोजी मुरादपुर, मार्लेश्वर फाटा येथे अपघात झाला होता. माझ्या वडीलांच्या पायांना व उजव्या हाताला मार लागला होता.

**०२**. दिनांक २२/०४/२०२५ रोजी माझ्या वडीलांच्या अपघातावेळी मी करंबेळे येथे हजर होतो. सदर अपघाताबाबत माझी बहीण पुर्वा ढोके हिने मला कळविले होते. तेथील लोकांनी माझ्या वडीलांना देवरुख, ग्रामीण रुग्णालयात आणले होते. त्यामुळे मी देखील देवरुख येथील ग्रामीण रुग्णालयात गेलो होतो. तेथे माझ्या वडीलांवर प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना सामान्य रुग्णालय, रत्नागिरी येथे पुढील उपचाराकरीता मी रुग्णवाहीकेतुन घेवुन गेलो. तेथील डॉक्टरांनी माझे वडीलांना कोल्हापुर येथील सी.पी.आर. हॉस्पीटलमध्ये नेण्यास सांगितले. त्यावेळी मी, माझी आई व आरोपीचे वडील – श्रीधर खेडेकर असे हजर होतो.

**०३**. अपघात झाला होता म्हणुन श्रीधर खेडेकर यांना आमच्या सोबत वाडीतील लोकांनी पाठविले होते. ते आमच्या ओळखीचे आहेत. सी.पी.आर.

हॉस्पीटल, कोल्हापुरमध्ये माझ्या वडीलांवर उपचार करण्यात आले. त्यानंतर दिनांक २३/०४/२०२५ रोजी दुपारी ०३:३० च्या सुमारास ते मयत झाले. तेथे शवविच्छेदन करण्यात आले. त्यावेळी तेथे पोलीस हजर होते. त्यामुळे माझा जबाब नोंदविण्यात आला होता. *(साक्षीदाराला लक्ष्मीपुरी, कोल्हापुर पोलीसांनी नोंदविलेला त्याचा जबाब दाखविण्यात आला). त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर नमुद केला आहे. (सदर दस्तास* ***निशाणी क्रमांक २१*** *देण्यात येते).*

०४. *(साक्षीदाराला ताबा पावती दाखविण्यात आली). ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर नमुद केला आहे. (सदर दस्तास* ***निशाणी क्रमांक २२*** *देण्यात येते).*

०५. त्यानंतर, *दोन ते तीन दिवसांनी देवरुख पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. त्यावेळी पोलीसांनी माझी सही घेतली होती. (साक्षीदाराला देवरुख पोलीसांनी नोंदविलेला त्याचा जबाब दाखविण्यात आला). त्यातील मजकुर बरोबर नाही. (****स्वाक्षरी पुरत्या भागास निशाणी क्रमांक २३*** *देण्यात येते).*

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

०६. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबतचा वाद न्यायालयाबाहेर तडजोड होवुन मिटला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांच्याकडून –**

**०७**. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक २१ कडील लिखाण आज रोजी प्रथम माझ्या वाचण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोल्हापुरात असताना वडीलांचा मृतदेह ताब्यात घ्यायचा असल्याने त्यावेळी पोलीसांनी माझी सही घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी करंबेळे येथे हजर असल्यामुळे नेमका अपघात कसा व काय घडला याबाबत मला वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याने माझी आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार उरलेली नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.23 17:44:18 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. २३.०४.२०२६

स्थळः देवरुख

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Devrukh |
| Date of decision | :- | 23/04/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 23/04/2026 |
| Evidence uploaded on | :- | 23/04/2026 |